# लाड महाविद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात

कुंडल : वार्ताहर

येथील क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयात 'गुरुपौर्णिमा' मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एम. नलवडे अध्यक्षस्थानी होते.

विद्यार्थ्यांना गुरुपौर्णिमेचे महत्त्व पटवून देताना डॉ. नलवडे म्हणाले, अंधारातून प्रकाशाकडे जो घेऊन जातो तो गुरू असतो. विद्यार्थ्यांच्या आयुष्यात ज्ञानाची शुभ्र प्रकाशित पौर्णिमा अवतीर्ण व्हावी, यासाठीच प्रत्येक गुरू झटत असतो. विद्यार्थ्यांनी विनम्र भावाने गुरूकडून ज्ञान घेऊन स्वत: ज्ञानी व्हावे. कार्यक्रमात महाविद्यालयातील सर्व शिक्षकांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

केसरी. ५/८/२०१५

# लाड महाविद्यालयात गुरूपौर्णिमा उत्साहात

**कुंडल :** क्रांतीअग्रणी डॉ.जी. डी. बापू लाड महाविद्यालयात गुरूपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्राचार्य डॉ. के. एम. नलवडे उपस्थित होते. त्यांनी गुरूपौर्णिमेचे महत्त्व व गुरू-शिष्य यांचेमधील नात्यासंबंधी मौलिक मार्गदर्शन केले. गुरूबद्दलचे महत्व विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील सर्व शिक्षकांचे विद्यार्थ्यांकडून गुलाब पुष्प देऊन उत्साहात स्वागत करण्यात आले. स्वागत पुजा बसानरे हिने केले. अतिश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाचे नियोजन मराठी विभागाकडील विद्यार्थ्यांनी केले.

PAP

तरुण भारत / 7/8/15

दै. तरुणभारत 12 ऑगस्ट 15



कुंडल येथील जी. डी. बापू लाड महाविद्यालयात क्रांतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्राचार्य विजय नलवडे यांनी मार्गदर्शन केले.

# कुंडलमध्ये क्रांतिदिन उत्साहात

कुंडल : मोठी माणसे ही कर्तबगार व मनाने श्रीमंत असल्यानेच ती इतिहासामध्ये अजरामर झाली. त्यांचा इतिहास आजच्या पिढीला समजण्यासाठी विद्यार्थ्यांना राष्ट्रीयत्वाचे शिक्षण देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. विजय नलवडे यांनी केले.

कुंडल येथील क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयात ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी क्रांती उद्योग समूहाचे प्रमुख अरुण लाड व महाविद्यालयाचे प्राचार्य के. एन. नलवडे उपस्थित होते.

स्वातंत्र्यसैनिकांचा इतिहास विद्यार्थ्यांनी अभ्यासणे गरजेचे आहे. ते त्या काळात परकीय शक्तींविरुद्ध लढले, तर आपण आपल्या हक्कांसाठी का लढू नये. यासाठी विद्यार्थ्यांनी जागृत होण्याची गरज आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

स्वागत प्राचार्य के. एन. नलवडे यांनी केले, तर प्रा. शुभांगी खरात यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. ऋषिकेश खारगे यांनी केले.

# विद्यार्थ्यांना राष्ट्रीयत्वाचे शिक्षण देणे गरजेचे : डॉ. विजय नलवडे

**कुंडल : वार्ताहर**

मोठी माणसं ही कर्तबगार व मनाने श्रीमंत असल्यानेच ती इतिहासामध्ये अजरामर झाली, त्यांचा इतिहास आजच्या पिढीला समजण्यासाठी विद्यार्थ्यांना राष्ट्रीयत्वाचे शिक्षण देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. विजय नलवडे यांनी केले. कुंडल येथील क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयात ऑगस्ट क्रांतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी क्रांती उद्योग समूहाचे प्रमुख अरुण लाड व महाविद्यालयाचे प्राचार्य के. एन. नलवडे उपस्थित होते.



क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयात क्रांती दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्राचार्य डॉ. विजय नलवडे यांनी मार्गदर्शन केले.

डॉ. नलवडे म्हणाले, देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याकरिता अनेक स्वातंत्र्यवीरांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. त्यांच्या बलिदानाचे स्मरण करत त्यांना श्रद्धांजली वाहणे इतकेच आपले काम नाही. कारण स्वातंत्र्यानंतर ही कित्येक स्वातंत्र्य सैनिकांनी सुराज्य द्यावे म्हणून आयुष्याच्या शेवटपर्यंत लढा दिला.

लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, सरदार वल्लभभाई पटेल, सुभाषचंद्र बोस या नेत्यांनी देशासाठी स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व केले. त्याचाच परिपाक म्हणून क्रांतिसिंह नाना पाटील, नागनाथ नायकवडी व जी. डी. बापू लाड यांनी प्रतिसरकारच्या माध्यमातून इंग्रजांशी लढा दिला. इतकेच नाही तर स्वातंत्र्यानंतरही ते कष्टकऱ्यांसाठी लढत राहिले.

अरुण लाड म्हणाले, १९४२ चे 'चले जाव' आंदोलन ५ वर्षे धुमसले. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाला. हे स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी उत्तर प्रदेशातील बलिया, पं. बंगालमधील मिदनापूर व महाराष्ट्रात दक्षिण सातारा जिल्ह्यात प्रतिसरकारे स्थापन झाली. हे तीन जिल्हे स्वतंत्र झाले. साताराचे प्रतिसरकार अखेर पर्यंत टिकले. स्वातंत्र्यानंतर सत्तालालची लोकांची स्वार्थी वृत्ती वाढली, लाचारी वाढली, सत्तेपुढे समाज दुय्यम झाला, शेती, शेतकरी, सामान्यांना शिक्षण मिळत नाही. सामान्यांची मुले उच्च शिक्षणापासून मैलोन्मैल दूर आहेत.

हे थांबविण्यासाठी स्वातंत्र्य सैनिकांचा इतिहास विद्यार्थ्यांनी अभ्यासणे गरजेचे आहे. यावेळी प्राध्यापक, विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते.

तरुण भारत
सांगली दिनांक पान ३
शुक्रवार 14 ऑगस्ट 2015

# आजच्या युवकांना राष्ट्रीयत्वाचे शिक्षण देणे गरजेचे

## प्राचार्य डॉ. विजय नलवडे यांचे प्रतिपादन : क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड महाविद्यालयात क्रांतीदिनानिमित्त व्याख्यान

वार्ताहर
कुंडल

मोठी माणसे ही कर्तबगार व मनाने श्रीमंत असल्यानेच ती इतिहासात अजरामर झाली. त्यांचा इतिहास आजच्या पिढीला समजण्यासाठी विद्यार्थ्यांना राष्ट्रीयत्वाचे शिक्षण देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. विजय नलवडे यांनी केले ते कुंडल येथील क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड महाविद्यालयात बोलत होते.

क्रांती उद्योग समुहाचे प्रमुख अरुण लाड व प्राचार्य के.एन.नलवडे प्रमुख उपस्थित होते.

डॉ.नलवडे म्हणाले, देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याकरिता अनेक स्वातंत्र्यवीरांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. त्यांच्या बलिदानाचे स्मरण करत त्यांना श्रध्दांजली वाहणे इतकेच आपले काम नाही. कारण स्वातंत्र्यानंतरही कित्येक स्वातंत्र्यसैनिकांनी सुराज्य यावे म्हणून शेवटच्या श्वासापर्यंत लढा दिला. त्यांनी पारंपारिक चालिरीती, रुढी, परंपरा यांच्या बरोबरच इंग्रजांना सहाय्य करणाऱ्या वतनदार, पाटील यांच्याबरोबरच गावगुडांचाही बंदोबस्त केला. नऊ ऑगस्ट हा क्रांतिदिन म्हणून साजरा केला जातात. त्यामुळे आजच्या पिढीला लोकांनी केलेल्या बलिदानाचे स्मरण व्हावे म्हणून लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, सदरार वल्लभभाई पटेल, सुभाषचंद्र बोस या व अशा अनेक नेत्यांनी देशासाठी स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व केले. त्याचाच परिपाक म्हणून नाना पाटील, नागनाथ नायकवडी व जी. डी. बापू लाड यांनी प्रती सरकारच्या माध्यमातून इंग्रजांशी लढा दिला. इतकेच नाही तर स्वातंत्र्यानंतरही ते कष्टकऱ्यांसाठी लढत राहिले.

**स्वातंत्र्यानंतर लोकांच्यात स्वार्थी वृत्ती, लाचारी वाढली.**




कुंडल : क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयात आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. नलवडे.

अरुण लाड म्हणाले, १९४२ चले जाव आंदोलन पाच वर्षे धुमसले १५ ऑगस्ट रोजी देश स्वतंत्र झाला. हे स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी उत्तरप्रदेशातील बलिया, पं.बंगालमधील मिदनापूर व महाराष्ट्रात दक्षिण सातारा जिल्ह्यात प्रतिसरकारे स्थापन झाली. हे तीन जिल्हे स्वतंत्र झाले. सातारचे प्रतीसरकार अखेरपर्यंत टिकले.

प्रतिसरकारच्या तुफान सेनेने स्वातंत्र्याच्या लढ्याबरोबरच सावकार, गुंड यांच्यावर दहशत बसवून सावकारशाही व गुंडगिरी मोडीत काढल्याने सर्वसामान्य जनता सुखी झाली. स्त्रियाही स्वातंत्र्य लढ्यात भाग घेत होत्या.

देश स्वतंत्र व्हावा म्हणून अनेकांनी गोळ्या झेलल्या. सातारच्या लढ्यात जी. डी. बापूंसह अनेकांना गोळ्या लागल्या. ते वाचले म्हणून आपण त्यांना पाहू शकलो. देश स्वातंत्र होवून देशबांधवांना अन्न, वस्त्र, निवारा, हाताला काम, योग्य शिक्षण व शेतमालाला योग्य भाव मिळावा ही जिद्द होती.

स्वातंत्र्यानंतर लोकांची स्वार्थी वृत्ती वाढली. लाचारी वाढली, सत्तेपुढे समाज दुय्यम झाला, शेती, शेतकरी, कामगार उघड्यावर पडला, शिक्षणाचे खासगीकरण झाले. सामान्यांना शिक्षण मिळत नाही. सामान्यांची मुले उच्चशिक्षणापासून दूर आहेत. हे थांबण्यासाठी स्वातंत्र्यसैनिकांचा इतिहास विद्यार्थ्यांनी अभ्यासण्याचे गरजेचे आहे. स्वातंत्र सैनिक त्याच्याकाळात इंग्रजांविरुध्द लढले आता आपण हक्कासाठी लढावे असे मत व्यक्त केले. यावेळी प्राध्यापक, विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते.